**ठळक बातम्या**

- दिल्ली विधानसभा निवडणुकीत २६ वर्षांनंतर भाजपाची बहुमताकडे वाटचाल

- नवीन प्राप्तिकर विधेयक पुढच्या आठवड्यात संसदेत सादर होणार

- ३८व्या राष्ट्रीय क्रीडास्पर्धांमधे महाराष्ट्राचं पदकांचं शतक पूर्ण /१० हजार मीटर धावण्याच्या स्पर्धेत महाराष्ट्राच्या संजीवनी जाधवला सुवर्णपदक

**आणि**

- ज्येष्ठ पत्रकार, पंढरीनाथ सावंत यांचं निधन

**<><><><><>**

दिल्ली विधानसभा निवडणुकीत भाजपाने मुसंडी मारली असून आत्तापर्यंत अधिकृतरीत्या २८ जागांचे निकाल जाहीर झाले आहेत. भाजपाला १७ आणि आम आदमी पार्टीला ११ जागा मिळाल्या आहेत. हाती आलेल्या कलांनुसार भाजपा २६ तर आम आदमी पार्टी १२ जागांवर आघाडीवर आहे. काँग्रेसचा पूर्णपणे धुव्वा उडाला असून त्यांना एकाही जागी विजय मिळवता आलेला नाही. भाजपा २६ वर्षांनंतर पुन्हा एकदा दिल्लीत सत्तेत येत असल्यामुळे भाजपाच्या गोटात आनंदाचं वातावरण आहे. दिल्लीतल्या भाजपा कार्यालयात कार्यकर्ते फटाके वाजवून आणि मिठाई वाटून विजय साजरा करत आहेत.

आपचे अनेक दिग्गज उमेदवार पराभवाच्या छायेत आहेत. नवी दिल्ली मतदारसंघातून भाजपाचे परवेश वर्मा यांनी आपचे प्रमुख अरविंद केजरीवाल यांच्याविरूद्ध निर्णायक आघाडी घेतली आहे. जंगपुरा मतदारसंघात भाजपाचे नेते तरविंदर सिंग मारवाह यांनी आपचे ज्येष्ठ नेते मनीष सिसोदिया यांच्याविरूद्ध

निर्णायक आघाडी घेतली आहे. कालकाजी मतदारसंघातून आपच्या मुख्यमंत्री आतिशी यांनी निर्णायक आघाडी घेतली आहे. सोमनाथ, भारती, सौरभ भारद्वाज आणि अवध ओझा हे आपचे प्रमुख नेते पिछाडीवर आहेत. या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसच्या सर्व उमेदवारांचं डिपॉझिट जप्त झालं आहे.

**<><><><><>**

लोककल्याणकारी योजनांमुळे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी जनतेचा विश्वास जिंकला, असं केंद्रीय मंत्री पियूष गोयल यांनी आज मुंबईत सांगितलं. दिल्ली विधानसभा निवडणुकीत भाजपानं मिळवलेल्या यशाबद्दल ते बोलत होते. गेल्या दहा वर्षांत अरविंद केजरीवाल यांनी भ्रष्टाचार आणि अनागोंदी कारभार केला आणि त्यामुळे दिल्लीकरांनी त्यांना पराभूत केल्याचं ते म्हणाले. अरविंद केजरीवाल यांनी प्रामाणिकपणाची भाषा केली, पण प्रत्यक्ष कृती वेगळी होती. मतदारांनी हा फरक ओळखला आणि म्हणूनच मतं घसरली, अशी टीका ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी केली. प्रधानमंत्री मोदी यांच्या नेतृत्वाखाली दिल्लीला जनतेची सेवा करणारं सरकार मिळाल्याचं केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी म्हटलं आहे. प्रधानमंत्र्यांच्या दूरदृष्टीतून भाजपा सरकार दिल्लीचा विकास करेल, असं नवी दिल्लीतले भाजपा उमेदवार परवेश वर्मा यांनी सांगितलं. काँग्रेस आत्मपरीक्षण करेल असं काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्या प्रियंका गांधी यांनी पक्षाच्या दारूण पराभवाबद्दल म्हटलं आहे. आपचे मनीष सिसोदिया यांनी पराभव स्वीकारत असल्याचं म्हटलं आहे.

**<><><><><>**

येत्या आठवड्यात संसदेत नवीन प्राप्तिकर विधेयक आणलं जाईल, त्यानंतर ते संसदीय स्थायी समितीकडे पाठवलं जाईल, असं केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी आज सांगितलं. दिल्ली इथं रिझर्व्ह बँकेच्या संचालक मंडळाच्या

बैठकीनंतर गव्हर्नर संजय मल्होत्रा यांच्यासोबतच्या संयुक्त पत्रकार परिषदेत त्या बोलत होत्या. आर्थिक विकासाकरता आणि महागाईच्या आव्हानाला सामोरं जाण्यासाठी सरकार आणि रिझर्व्ह बँक एकत्र मिळून काम करत आहेत, असं सीतारामन यांनी सांगितलं. महागाई असो किंवा विकासाचा मुद्दा असो चलनविषयक धोरण आणि वित्तीय धोरण समन्वयाने आखलं पाहिजे, तरच जनतेला त्याचा लाभ होईल असंही त्या म्हणाल्या.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी येत्या सोमवारपासून फ्रान्स आणि अमेरिकेच्या दौऱ्यावर जाणार आहेत. फ्रान्सचे अध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉ यांच्या आमंत्रणावरून प्रधानमंत्री १० ते १२ फेब्रुवारी दरम्यान फ्रान्सला भेट देणार आहेत. पॅरिसमध्ये आयोजित एआय कृती शिखर परिषदेचं सह-अध्यक्ष पद ते भूषवतील. या शिखर परिषदेत कृत्रिम बुद्धिमत्तेच्या व्यवस्थापनाचं भविष्य या विषयावर विविध राष्ट्रांचे नेते चर्चा करणार आहेत. एआयचा मूल्याधिष्ठित विकास, उपलब्धता, आणि नवोन्मेष अशा अन्य पैलूंवरही या परिषदेत चर्चा होणार आहे. मोदींच्या या दौऱ्यात ते फ्रान्सच्या नेतृत्वाशी संरक्षण, व्यापार, ऊर्जा सहकार्य इत्यादी मुद्द्यांवर तसंच द्विपक्षीय संबंध आणखी दृढ करण्यासंदर्भात चर्चा करतील. तसंच मार्सेली इथं सुरू होत असलेल्या भारताच्या नव्या वाणिज्य दूतावासाच्या उद्घाटन समारंभालाही ते हजेरी लावणार आहेत.

<><><><><>

सोयाबीन खरेदीचा प्रश्न केंद्र सरकार सोडवू शकेल, असं भाजपा नेते आणि कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल यांनी म्हटलं आहे. सोयाबीन खरेदी प्रश्नावर आपण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशीही चर्चा करणार असल्याचं पाशा पटेल यांनी सांगितलं. …

**बाईट- पाशा पटेल**

**<><><><><>**

उत्तराखंडमध्ये सुरू असलेल्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांमध्ये महाराष्ट्राने पदकांची शंभरी पार केली आहे. महाराष्ट्राकडे सर्वाधिक १०७ पदकं असून त्यात २३ सुवर्ण, ३९ रौप्य आणि ४५ कांस्य पदकांचा समावेश आहे. सध्या पदकतालिकेत महाराष्ट्र तिसऱ्या क्रमांकावर असून ३९ सुवर्ण पदकांसह सेना दलं पहिल्या तर ३० सुवर्ण पदकांसह कर्नाटक दुसऱ्या क्रमांकावर आहे. या स्पर्धेत महाराष्ट्राचे खेळाडू चमकदार कामगिरी करताना दिसत आहेत. १० हजार मीटर धावण्याच्या स्पर्धेत  आज महिला गटात महाराष्ट्राच्या संजीवनी जाधव हिने सुवर्णपदक पटकावलं असून पुरुषगटात किरण माने याने रौप्य पदक पटकावलं आहे. काल झालेल्या महिला मुष्टियुद्ध स्पर्धेत महाराष्ट्राच्या दिव्या पवारनं ४५ किलो वजनी गटात सुवर्णपदक पटकावलं. महिलांच्या सांघिक टेनिसच्या अंतिम फेरीत, महाराष्ट्राने गुजरातवर विजय मिळवत सुवर्णपदक जिंकलं.

**<><><><><>**

कोलकाता इथं सुरु असलेल्या रणजी क्रिकेट करंडक स्पर्धेच्या उपांत्यपूर्व फेरीत हरयाणाविरुद्ध नाणेफेक जिंकून मुंबई संघानं प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला मात्र मुंबई संघाची सुरुवात निराशाजनक झाली. अवघ्या २५ धावसंख्येवर मुंबईचे ४ खेळाडू तंबूत परतले. त्यानंतरच्या खेळाडूंनी डाव सावरल्यानं मुंबईला दोनशे धावांचा आकडा गाठता आला. शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा मुंबईच्या ७ गडी बाद २११ धावा झाल्या होत्या.

**<><><><><>**

पालघर जिल्ह्यात, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, भारत पर्यटन  आणि नाबार्ड यांच्या सहकार्यानं चिकू महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. शेती,

ग्रामीण उद्योजकता आणि समृद्ध ग्रामीण संस्कृतीचा मेळ पर्यटनाबरोबर घालून ग्रामीण अर्थव्यवस्था सक्षम करणं आणि ग्रामीण जीवनाला सन्मान प्राप्त करून देणं, हा या महोत्सवाचा उद्देश आहे, अधिक माहिती आमच्या वार्ताहराकडून…

**व्हॉइस कास्ट - नीतू चौरे - पालघर**

**<><><><><>**

ज्येष्ठ पत्रकार, पंढरीनाथ सावंत यांचं आज पहाटे मुंबईत त्यांच्या राहत्या घरी निधन झालं. ते ९० वर्षांचे होते. माहिती आणि जनसंपर्क महासंचालनालय यांचा लोकमान्य टिळक जीवनगौरव पुरस्कार, मुंबई मराठी पत्रकार संघाचा पुढारीकार ग. गो. जाधव पुरस्कार तसंच मंत्रालय आणि विधिमंडळ वार्ताहर संघाचा कृ. पां. सामक जीवनगौरव पुरस्कार त्यांना मिळाला होता. प्रबोधनकार ठाकरे यांच्या समग्र वाङ्मयाचं संपादन त्यांनी केलं होतं. ‘गिरणगावचा पंढरी’ आणि ‘पत्रकार पंढरी’ ही त्यांची आत्मचरित्रं विशेष गाजली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, तसंच एकनाथ शिंदे आणि अजित पवार या दोन्ही उपमुख्यमंत्र्यांनी सावंत यांच्या निधनाबद्दल तीव्र दुःख व्यक्त केलं आहे.

**//<><><><><>//**